अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | बुधवार
०४.११.२०२६

वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २७५ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

आदिवासी बांधवांसाठी सरकारची विशेष मोहीम

आधारकार्ड, जन्म दाखले : विशेष शिबिरे आयोजित करणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई - राज्यातील १६ आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये आधार कार्डपासून वंचित नागरिकांसाठी तातडीने विशेष मोहीम राबवावी.

तसेच जन्म नोंदणीसाठी विशेष शिबिरे आयोजित करावीत, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. प्रत्येक आदिवासी जिल्ह्याला स्वतंत्र आधार नोंदणी संच उपलब्ध करून देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि आदिवासी संघटनांनी पुढाकार घेऊन जनजागृती करावी, जनसभा आयोजित कराव्यात आणि नागरिकांच्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

मंत्रालयात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी, कष्टकरी, महिला, बालके व कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत बैठक पार पडली.

यावेळी वसईच्या आमदार स्नेहा दुबे पंडित, डहाणूचे आमदार विनोद निकोले, माजी आमदार विवेक पंडित, जे. पी. गावीत, पुनर्वसन विभागाचे सहसचिव संजय इंगळे, किसान सभेचे कार्याध्यक्ष रडका कलांगडा, कोषाध्यक्ष सदाशिव साबळे, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे पालघर जिल्हा सचिव किरण गहला, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, ठाणे, पालघर व अहिल्यानगर जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे पदाधिकारी उपस्थित होते.

नोंद नसलेल्या, बेदखल कुळांचे प्रश्न मार्गी लावणार डहाणू व तलासरी तालुक्यांसह संबंधित क्षेत्रांतील अभिलेखांमध्ये नोंद नसलेल्या आणि बेदखल झालेल्या कुळांच्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. कायदेशीर तरतुदींचा विचार करून प्राधान्याने प्रस्ताव सादर करावा. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शासन सकारात्मक निर्णय घेईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

वनहक्क दाव्यांच्या निपटाऱ्यासाठी विशेष मोहीम प्रलंबित वैयक्तिक आणि सामूहिक वनहक्क दावे निकाली काढण्यासाठी विशेष कालबद्ध मोहीम राबवण्याचे निर्देश महसूल मंत्र्यांनी दिले. सक्षम समित्यांनी प्रलंबित दाव्यांवर कारणांसहित निर्णय घ्यावेत.

यासाठी ग्रामसभेचे अभिलेख, प्रत्यक्ष वहिवाटीचे पुरावे आणि कायद्यानुसार ग्राह्य असलेल्या अन्य पुराव्यांचा विचार करावा. उपग्रह प्रतिमा आणि संबंधित तांत्रिक माहितीचाही पूरक साधन म्हणून वापर करावा, असे त्यांनी सांगितले.

नशेच्या विळख्याला आता सरकारी घेराव!

अमली पदार्थांविरोधात १९ सरकारी विभाग एकत्र येणार!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



पुणे - राज्यातील अमली पदार्थांच्या वाढत्या धोक्याला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या वतीने व्यापक 'ड्रग फ्री' अभियान राबविण्यात येणार आहे. या मोहिमेसाठी शासनाचे तब्बल १९ विभाग एकत्रितपणे काम करणार असून, अमली पदार्थांची खरेदी-विक्री रोखण्यासोबतच समाजात जनजागृती निर्माण करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिली.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने विविध विकासकामांचे उद्घाटन, भूमिपूजन आणि अत्याधुनिक पोलीस साधनसामग्रीच्या लोकार्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आकुर्डी येथील ग. दि. माडगुळकर नाट्यगृहात झालेल्या या कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ आणि राज्यमंत्री योगेश कदम यांच्यासह खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, उमा खापरे आदी उपस्थित होते.

अमली पदार्थांच्या वाढत्या प्रसाराबाबत चिंता व्यक्त करताना मुख्यमंत्री म्हणाले की, काही विदेशी शक्ती भारताची प्रगती रोखण्याच्या उद्देशाने देशातील तरुण पिढीला व्यसनाधीन करण्याचे षड्यंत्र रचत आहेत. पंजाबमध्ये अमली पदार्थांचे जाळे पसरवून तेथील परिस्थिती बिघडविण्याचा प्रयत्न झाला, त्याच धर्तीवर इतर राज्यांमध्येही असे प्रयत्न होत आहेत.

सध्या सिंथेटिक ड्रग्जचा वापर वाढत असून, तरुण व्यसनाधीन होत आहेत. त्यातून गुन्हेगारीचे प्रमाणही वाढत आहे. ही केवळ कायदा आणि सुव्यवस्थेची समस्या नसून सामाजिक लढाई आहे. व्यसनाधीन तरुणांवर केवळ कायदेशीर कारवाई करून प्रश्न सुटणार नाही. त्यांना वैद्यकीय उपचार आणि समुपदेशन देऊन व्यसनमुक्त करणे तसेच समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हेही सरकारचे उद्दिष्ट असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

थोडक्यात

नैसर्गिक आपत्तीग्रस्त मच्छीमारांना केंद्राचा दिलासा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई - नैसर्गिक आपत्तीमुळे बोटी, मासेमारीची जाळी आणि मत्स्यव्यवसायाशी संबंधित साधनांचे नुकसान झालेल्या मच्छीमारांना केंद्र सरकारकडून आर्थिक मदत दिली जाणार आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या मदतीच्या निकषांमध्ये सुधारणा करण्यात आली असून, २०२६ ते २०३१ या कालावधीत हे नवे निकष लागू राहणार आहेत. या निर्णयामुळे आपत्तीग्रस्त मच्छीमार आणि लहान व सीमांत शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळणार आहे. सुधारित निकषांनुसार, मासेमारीच्या बोटी आणि जाळ्यांचे अंशतः किंवा पूर्ण नुकसान झाल्यास वेगवेगळी आर्थिक मदत दिली जाणार आहे. त्याचे दर पुढीलप्रमाणे आहेत.

भांडणातून विवाहितेचा खून : दोन वर्षानंतर दोन्ही आरोपींना जन्मठेप

वरुडच्या जिल्हा सत्र न्यायालयाचा निर्णय : १ लाख रुपयांचा दंड

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

वरुड - पैशाच्या देवाण-घेवाणीतून झालेल्या वादात सोबत राहणाऱ्या इसमाने महिलेची धारदार शस्त्राने हत्या करुन स्वत: विषारी द्रव्य प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना गेल्या २१ सप्टेंबर २०२४ च्या मध्यरात्रीच्या सुमारास तालुक्यातील एकदरा येथे घडली होती. हे प्रकरणी वरुड येथील जिल्हा सत्र न्यायालयात गेल्या दोन वर्षांपासुन सुरु होते, अखेरीत न्यायालयाने यातील आरोपी वसंता नत्थु मुंगभाते रा.तरोडा, ता.कारंजा, जि.वर्धा यास सश्रम आजन्म कारावास व १ लाख रुपयांचा रुपये दंड, दंड न भरल्यास २ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.



सविस्तर माहितीनुसार, तालुक्यातील एकदरा येथील मृतक महिला कमला सागर कोल्हे (३०) हिचा विवाह अंदाजे १० वर्षांपुर्वी काटोल जि.नागपुर येथील कोल्हे परिवारामध्ये झाला होता परंतु तिचा पती मद्यपी असल्यामुळे ती गेल्या काही वर्षांपासुन माहेरी भावाकडे राहत होती. गेल्या ६ महिन्यांपुर्वी तिने पासुन गावातील राऊत यांचेकडे भाड्याने खोली करुन तिच्या ९ वर्षाच्या मुलासह राहात होती. घटलेच्या १ वर्षा पुर्वीपासुन ती वसंत मुंगभाते रा.तरोडा, भारसिंगी, जि.नागपूर याचेसोबत स्वयंपाकाचे कामासाठी बाहेर जात होती. वसंत हा अनेकदा तिला सोबत दुचाकीवर घेवुन जायचा व परत सुध्दा आणुन द्यायचा. सुमारे १ महिन्यांपासुन वसंत हा कमला हिचेसोबत तिचे एकदरा येथे भाड्याच्या घरीच राहात होता. मागील १५ ते २० दिवसांपासुन त्या दोघांमध्ये पैशाचे वादावरुन भांडण सुरु होते व सतत तुला मारुन टाकील, अशा धमक्या वसंत तिला देत होता.

घटनेच्या दिवशी २१ सप्टेंबर २०२४ ला मध्यरात्रीच्या सुमारास कमला व आरोपी वसंत यांचे कडाक्याचे भांडण झाले व या भांडणात वसंत याने कमलाच्या गळ्यावर धारदार चाकूने सपासप वार केले व तो घटनास्थळावरुन पळुन गेला. त्यानंतर त्याने विषारी द्रव्य प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मृतक महिलेचा मुलगा दिपक याने त्याचा मामा कृष्णा याला फोन करुन आईला काही तरी झाले, असे सांगितल्यावरुन माहेरील कुटूंब घटनास्थळी दाखल झाले तर कमला ही रक्ताच्या थारोळ्यात घरात पडून होती. अधिक माहीती घेतली असता आईला वसंत मुंगभाते याने चाकूने मारले, असे मुलगा दिपक याने सांगितल्यानंतर पोलिसांना हीं माहिती देण्यात आली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला व मृतदेह उत्तरीय तपासणीकरीता ग्रामीण रुग्णालयात पाठविला. मारेकरी वसंत याचा पोलिसांनी शोध सुरु केला असता वसंत हा विषारी द्रव्य प्राशन केलेल्या अवस्थेत दिसून आला. पोलिसांनी त्याला ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. ग्रामीण रुग्णालयात त्यांचेवर प्राथमिक उपचार करून त्याला पुढील उपचाराकरिता जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले होते, या प्रकरणी वरुड पोलिंसानी कृष्णा पिलाजी डांगे (२४) यांचे फिर्यादीवरुन वसंत मुंगभाते विरुध्द १०३ (२) बी.एन.एस.खुनाचा गुन्हा दाखल केला होता.

सदर प्रकरण वरुडच्या जिल्हा सत्र न्यायालयात गेल्या दोन वर्षांपासुन सुरु होते, न्यायालयाने या प्रकरणातील साक्षीदार, पुरावे आणि इतर बाबींचा विचार करुन आरोपी वसंत मुंगभाते हा दोषी असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्याला सश्रम आजन्म कारावास व १ लाख रुपयांचा रुपये दंड, दंड न भरल्यास २ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

पालकमंत्री नितेश राणे यांच्या पाठपुराव्याला यश : पर्यटन आणि व्यापाराला मिळणार गती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई - सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणारी चिपी ते नवी मुंबई विमानसेवा आता दररोज सुरू होणार आहे. आतापर्यंत मर्यादित स्वरूपात उपलब्ध असलेल्या या विमानसेवेला दैनिक स्वरूप मिळाल्याने कोकण आणि मुंबईदरम्यानचा प्रवास अधिक सुलभ होणार आहे. पालकमंत्री नितेश राणे यांनी या सेवेसाठी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे (एमएडीसी) उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर यांनी सुधारित वेळापत्रकाची माहिती दिली आहे. नवीन वेळापत्रकानुसार, नवी मुंबई येथून सकाळी ७:५५ वाजता विमान सिंधुदुर्गाच्या दिशेने उड्डाण करेल. सकाळी ९:०५ वाजता हे विमान चिपी विमानतळावर पोहोचेल. त्यानंतर सकाळी ९:२५ वाजता चिपी येथून परतीचा प्रवास सुरू होईल. सकाळी १०:३५ वाजता हे विमान नवी मुंबईत दाखल होईल. त्यामुळे दोन्ही शहरांदरम्यान दररोज विमानप्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.



तापमान

	कमाल	किमान
अमरावती	२९	२४
यवतमाळ	२८	२१
अकोला	२७	२४
वाशिम	२८	२३
बुलढाण	२७	२२
वर्धा	३०	२३
नागपूर	२९	२४
चंद्रपुर	२९	२५
गडचिरोली	२८	२३
नाशिक	२६	२२
पुणे	३०	२१

स्व.पंजाबराव ठाकरे कृषी तंत्र विद्यालयात येथे कृषी मेळावा उत्साहात संपन्न

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – स्व.पंजाबराव ठाकरे कृषी तंत्र विद्यालय हातूर्णा येथे कृषी मेळाव्याचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. अमृत पॅटर्न पद्धतीने कापूस लागवड केलेल्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावर हा मेळावा पार पडला. या प्रक्षेत्रात कावेरी सीड कंपनीच्या 'बंपर' या कापूस वाणाची लागवड करण्यात आली आहे.

कृषी तंत्र विद्यालय हातूर्णा आणि कावेरी सीड कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या मेळाव्याचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती देणे हा होता. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना कापूस लागवडीच्या नवीन पद्धती, पीक व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे होते. कावेरी सीड कंपनीचे मार्गदर्शक दिगंबर डोंगरे यांनी कापुस पिकातील अद्ययावत तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती दिली. प्रमुख अतिथी म्हणुन घोराडचे प्रगतिशील शेतकरी वासुदेव कडू, स्व.पंजाबराव ठाकरे कृषी तंत्र विद्यालयाचे प्राचार्य व सर्व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

यावेळी कापूस लागवडीतील अद्ययावत तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन आणि उत्पादनवाढीसाठी आवश्यक उपाययोजना यावर सखोल चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या विविध समस्यांचे निराकरण करुन त्यांच्या शंकांचे समाधान करण्यात आले. प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर आयोजित केलेल्या या मेळाव्यामुळे शेतकऱ्यांना आधुनिक लागवड तंत्रज्ञान समजुन घेण्याची संधी मिळाली. शेवटी प्रशांत शेरेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. त्यानंतर कृषी मेळाव्याची सांगता झाली.





वरुड : योगगुरु अशोक घोरमाडे यांना वाढदिवसानिमित्ताने पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती नरेंद्र पावडे, सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी सतिश देशमुख, नरेंद्र काळे, उध्दव फुटाणे, नरेंद्र लिखितकर, महेंद्र राऊत, संदीप धोटे, सुरेश सालोडे, पंकज अनासाने व इतर.

आदेश, नोटीस आणि पोलिस संरक्षणाची परवानगी असुनही अतिक्रमण हटेना

अतिक्रमण धारकांकडून रुक्मा धोटे यांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचा आरोप

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



हिवरखेड – येथील विजय धोटे आणि त्यांची आई रुक्मा धोटे हे आपल्या घराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून संघर्ष करीत आहेत. विशेष म्हणजे, अतिक्रमण हटविण्यासंदर्भात ग्रामपंचायतीच्या नोटिसा, पं.स.गटविकास अधिकाऱ्यांचे आदेश, ग्रामपंचायतीचा मंजूर ठराव, तहसीलदार कार्यालयाचा पत्रव्यवहार तसेच पोलिस संरक्षणाची परवानगी मिळूनही ग्रामपंचायतीकडून प्रत्यक्ष अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

या अतिक्रमणासंदर्भात ग्रामपंचायतीकडून सन २०१२, २०१३ आणि २०२४ मध्ये नोटिसा देण्यात आल्या आहेत. त्यानंतर पं.स.गटविकास अधिकाऱ्यांनी १८ डिसेंबर २०२४ रोजी आदेश दिला तसेच २२ जानेवारी २०२५ रोजी ग्रामपंचायत ठराव मंजूर करण्यात आला. यानंतर १७ जून २०२५ रोजी तहसीलदार कार्यालयाकडून पत्रव्यवहार करण्यात आला. २७ जून २०२५ रोजी अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईसाठी पोलिस संरक्षणाची परवानगी मिळाली. त्यानंतर २ सप्टेंबर २०२५ रोजी अंतिम नोटीस बजावण्यात आली. इतक्या प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होऊनही ग्रामपंचायतीकडून प्रत्यक्ष अतिक्रमण हटविण्याची कारवाई का केली जात नाही, असा सवाल विजय धोटे यांनी उपस्थित केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे ही न्यायाची मागणी स्थानिक पातळीवर वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने विजय धोटे यांनी १८ मे २०२६ रोजी सर्व संबंधित कागदपत्रे व पुराव्यांसह जिल्हाधिकाऱ्यांना ई-मेल पाठविला आहे. या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून संबंधित ग्रामपंचायतीला आवश्यक निर्देश देण्याची मागणी केली आहे. ग्रामपंचायतीकडून अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईला होत असलेल्या विलंबाची चौकशी करावी तसेच रुक्मा धोटे यांना मिळालेल्या धमक्यांच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करुन कुटुंबाला सुरक्षा द्यावी आणि नियमानुसार अतिक्रमण हटविण्याची प्रत्यक्ष कारवाई पूर्ण करावी, अशी मागणी विजय धोटे यांनी केली आहे.

शेंदुरजनाघाटच्या न.प.प्राथमिक शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात

सावनेरच्या शिवतीर्थ वॉटर पार्कमध्ये ५४ विद्यार्थ्यांची धमाल!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



शेंदुरजनाघाट – येथील नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.१ च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल नुकतीच मोठ्या उत्साहात पार पडली. नागपूरजवळील सावनेर येथील प्रसिद्ध शिवतीर्थ वॉटर पार्क व ॲडव्हेंचर पार्क येथे आयोजित करण्यात आलेल्या या सहलीत इयत्ता तिसरी, चौथी आणि पाचवीच्या एकूण ५४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

सकाळी शाळेतून निघालेली सहल निर्धारित वेळेत शिवतीर्थ वॉटर पार्क येथे पोहोचली. तेथे विद्यार्थ्यांनी विविध वॉटर राईड्स, खेळ आणि मनोरंजनाच्या साधनांचा मनसोक्त आनंद लुटला. विशेषतः ॲडव्हेंचर पार्कमधील साहसी खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दिवसभरातील विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ मनोरंजनच नव्हे, तर शालेय वातावरणापलीकडील अनुभव घेण्याची संधी मिळाली. मित्रांसोबत वेळ घालवताना विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, सहकार्य आणि सहजीवनाची भावना विकसित होण्यास मदत झाली. अभ्यासासोबतच आनंददायी अनुभव देणारी ही सहल विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरली.

ही सहल यशस्वी करण्यासाठी शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक आशिष तडस यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक विजय बेलसरे, साहेबराव उईके, संदीप कोकाटे, सविता बोबडे, भाग्यश्री खवले, हर्षदा श्रीखंडे आणि अनिता कापसे यांनी विशेष परिश्रम घेतले तसेच संपूर्ण सहली दरम्यान विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची योग्य काळजी घेण्यात आली.

जरुडच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाची गगनभरारी

राहुल गवई याला आंतरमहाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धेत २०० मीटर धावण्यात सुवर्णपदक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारा संचालित तथा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयातील बी.एस्सी.भाग दोनमध्ये शिक्षण घेत असलेल्या राहुल गवई या विद्यार्थ्याने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धा २०२६-२७ मध्ये २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत त्याने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

राहुलच्या या यशामुळे जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर यशाची शिखरे गाठता येतात, हे राहुलने आपल्या कामगिरीतून सिद्ध केले आहे. राहुलच्या या उल्लेखनीय यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख यांनी त्याचे विशेष कौतुक करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गोपाल तडस यांनी राहुलच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, जिद्द, चिकाटी, प्रामाणिक प्रयत्न आणि मेहनतीच्या बळावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही मोठी भरारी घेऊ शकतात. त्याने या यशातून महाविद्यालयाची मान उंचावली आहे.

राहुल त्याच्या यशाचे श्रेय प्राचार्य डॉ.गोपाल तडस, आई तसेच मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देणाऱ्या सर्वांना दिले आहे. राहुलच्या या यशाबद्दल प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आणि परिसरातील क्रीडाप्रेमींकडून त्याचे अभिनंदन होत आहे.

सशक्त आणि संवेदनशील मनातुनच व्यक्तिमत्त्व विकास घडतो : डॉ.शिवा पुंडकर

नगर परिषद शिक्षण विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी आनंदी जीवन मेळाव्याचे आयोजन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



शेंदुरजनाघाट – विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी केवळ शैक्षणिक प्रगती पुरेशी नसून सशक्त आणि संवेदनशील मनाची जडणघडण होणे आवश्यक आहे. शिक्षक आणि आई-वडिलांशी असलेले नाते व्यक्तिमत्त्व घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. सशक्त आणि संवेदनशील मनातूनच व्यक्तिमत्त्वाचा खरा विकास होतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध मनोविकास तज्ञ डॉ.शिवा पुंडकर यांनी केले.

शेंदुरजनाघाट नगर परिषद शिक्षण विभागाच्या वतीने ३१ ऑक्टोबर रोजी नगर परिषद कम्युनिटी सभागृहात भारतीय लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी 'आनंदी जीवन मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ.पुंडकर यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांना मार्गदर्शन केले. आनंदी आणि समाधानी जीवन जगण्यासाठी व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व प्रभावी असणे गरजेचे आहे. जीवनात सकारात्मक विचार, आत्मविश्वास, संवेदनशीलता आणि नैतिक मूल्यांना विशेष महत्त्व आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता जीवनमूल्यांचे संवर्धन करावे, तसेच राष्ट्रीय मूल्ये आपल्या आचरणात रुजवावीत, असे आवाहनही डॉ.पुंडकर यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाला विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष सुवर्णा वरखडे तर प्रमुख अतिथी म्हणुन माजी नगराध्यक्ष तथा स्थायी समिती सदस्य प्रशांत सावरकर, ठाणेदार राहुल गवई, शिक्षण सभापती निलीमा कुबडे, बांधकाम सभापती ओमप्रकाश कांडलकर, महिला व बालकल्याण सभापती प्रिया पाटील, उपसभापती माधुरी माहुरे, शिक्षण समिती सदस्य विजय चौधरी, हर्षल फुटाणे, संगीता अकर्ते, सुनीता उईके, नगरसेवक पवन मोघे, शेख नासिर शेख बशीर, छोटू भाई, विशाल सावरकर, निलेश फुटाणे, कुमूद अळसपुरे आणि शितल होले यांची उपस्थिती होती. यावेळी पालकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माधव तिडके यांनी केले. शिक्षण सभापती नीलिमा कुबडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर नगराध्यक्षा सुवर्णा वरखडे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन रीना गिरी यांनी केले.

या कार्यक्रमाला नगर परिषदेच्या विविध शाळांचे मुख्याध्यापक किर्तीमाला धुर्वे, आयुब, गौरव बोरे, भावना मेंढे, शिक्षण लिपिक नीता हमाणे तसेच शिक्षक सविता कांडलकर, विजय राऊत, मोहम्मद अजीम, शेख पप्पूवाले, नंदकिशोर नागपुरे, नेहा सुपले, पंकज चापले, नेहा जाधव, हेमंत धानोरकर, प्रेमकुमार कापरे आणि विजयकुमार इंगळे सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कंत्राटी कर्मचारी सुनील डकरे, प्रथमेश मगर्दे, देवेंद्र सावरकर, सुरेश माळोदे आणि रुपराव सावरकर यांनी विशेष योगदान दिले. विद्यार्थ्यांच्या मनावर सकारात्मक विचार, जीवनमूल्ये आणि संवेदनशीलतेचे संस्कार करणारा हा आनंदी जीवन मेळावा उत्साहात संपन्न झाला.

५० कोटी देशवासीय गरिबीतून बाहेर : पंतप्रधानांचा दावा; पुणे मेट्रो-३चे उद्घाटन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



पुणे – 'गेल्या १० ते १२ वर्षांत देशातील सुमारे ५० कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यात आले आहे', असा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक बँकेच्या अहवालाच्या हवाल्याने मंगळवारी केला. यापूर्वी गरिबीविरोधातील लढा केवळ 'घोषणांपुरताच' मर्यादित होता, अशी टीकाही त्यांनी केली. मोदी यांनी विकासाच्या मुद्द्यावर भर देताना गेल्या १२ वर्षांत शहरी वाहतूक पायाभूत सुविधांमध्ये मोठे 'परिवर्तन' झाल्याचे अधोरेखित केले. गरीबांचे सक्षमीकरण आणि सुशासनाची प्रभावी अंमलबजावणी ही आपल्या सरकारची प्रमुख वैशिष्ट्ये असल्याचा दावाही मोदींनी केला. माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गिका-३चे उद्घाटन आणि पुणे मेट्रो टप्पा-२च्या भूमिपूजन मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. पूर्वी गरिबीविरोधातील लढा केवळ घोषणांपुरताच मर्यादित होता. मात्र, आज भारत प्रत्यक्ष कृतीतून गरिबीवर मात करत आहे, असे मोदी म्हणाले. देशाची आर्थिक प्रगती आणि गरिबी निर्मूलन या दोन्ही गोष्टी परस्परांशी निगडीत आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. पायाभूत सुविधांमधील वाढती गुंतवणूक आणि कल्याणकारी योजनांमुळे नागरिकांचे जीवनमान सुधारत असून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. केवळ मदत पुरविण्याऐवजी नागरिकांना सक्षम बनविण्यावर सरकारचा भर असल्याचेही मोदी यांनी सांगितले.

संपादकीय

जिंकायचे असेल तर परिस्थितीशी लढा, माणसांशी नाही

शेती परवडत नाही, मग जगायचे तरी कसे?

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे, असे आपण अभिमानाने सांगतो; मात्र याच शेतीचा कणा असलेला शेतकरी आज आर्थिक संकटाने मोडकळीस आला आहे. एकीकडे उत्पादन खर्च वाढतोय, दुसरीकडे शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. निसर्गाची साथ नाही, बाजारपेठेची हमी नाही आणि सरकारी धोरणांचा आधारही अनेकदा अपुरा पडतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्याने शेती करायची तरी कशी आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा तरी कसा? हा आज प्रत्येक शेतकऱ्यासमोर उभा असलेला गंभीर प्रश्न आहे. शेतकरी वर्षभर शेतात राबतो. उन्हाळ्याची तीव्रता असो, पावसाळ्यातील अतिवृष्टी असो किंवा हिवाळ्यातील कडाक्याची थंडी असो, त्याचे हात कधीच थांबत नाहीत. जमिनीची मशागत, बियाणे, खते, औषधांची फवारणी, मजुरी, पाणी आणि वीज यासाठी तो पदरमोड करतो. पीक चांगले येईल, बाजारात योग्य भाव मिळेल आणि कुटुंबाच्या गरजा पूर्ण होतील, या आशेवर तो संपूर्ण हंगाम काढतो. मात्र प्रत्यक्षात पीक बाजारात नेल्यानंतर त्याच्या अपेक्षांवर पाणी फिरते. उत्पादन खर्चही निघत नसेल तर शेतकऱ्याने जगायचे तरी कसे? आज शेतीचे गणित पूर्णपणे बदलले आहे. पूर्वी कमी खर्चात शेती करणे शक्य होते; मात्र आता प्रत्येक गोष्टीचा खर्च वाढला आहे. रासायनिक खते, कीटकनाशके, बियाणे, डिझेल, मजुरी आणि सिंचनाच्या खर्चात सातत्याने वाढ होत आहे. दुसरीकडे शेतमालाच्या बाजारभावात स्थिरता नाही. कधी बाजारात भाव कोसळतात, तर कधी मालाला अपेक्षित मागणी मिळत नाही. परिणामी शेतकऱ्याला उत्पादन विकताना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागते. विदर्भातील शेतकऱ्यांची परिस्थिती तर अधिकच चिंताजनक आहे. अमरावती जिल्ह्यातील वरूड-मोर्शी तालुका हा संत्रा उत्पादकांचा महत्त्वाचा पट्टा म्हणून ओळखला जातो. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने फळबागा उभ्या केल्या. मात्र बदलते हवामान, अवकाळी पाऊस, पाण्याची कमतरता, रोगराई आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. फळबाग जगविण्यासाठी हजारो रुपयांचा खर्च करावा लागतो; पण फळ विक्रीच्या वेळी अपेक्षित उत्पन्न मिळेलच याची खात्री नसते. अनेक वर्षे जपलेल्या बागा टिकविण्यासाठी शेतकऱ्याला कर्जाचा आधार घ्यावा लागतो. मग शेती हा व्यवसाय राहतो की आर्थिक जोखमीचा जुगार, असा प्रश्न निर्माण होतो. शेतकऱ्यांच्या अडचणी केवळ उत्पादनापुरत्या मर्यादित नाहीत. शेतमाल बाजारात गेल्यानंतर व्यापाऱ्यांच्या भावावर त्याचे आर्थिक गणित अवलंबून असते. शेतकरी माल पिकवतो, पण त्याच्या किमतीवर नियंत्रण ठेवण्याची ताकद त्याच्याकडे नसते.



सत्तेची खुर्ची महत्त्वाची की जनतेची सेवा?



लोकशाहीत सत्ता ही जनतेने दिलेली जबाबदारी असते, मालकी हक्क नव्हे! मात्र आजच्या राजकीय परिस्थितीकडे पाहिले असता जनतेची सेवा करण्यापेक्षा सत्तेची खुर्ची टिकविण्यासाठी सुरू असलेली धडपड अधिक प्रकर्षाने दिसून येते. निवडणुकीच्या काळात जनतेसमोर हात जोडणारे अनेक राजकीय नेते निवडून आल्यानंतर मात्र त्याच जनतेच्या प्रश्नांकडे पाठ फिरवताना दिसतात. त्यामुळे आज सामान्य नागरिकांच्या मनात एकच प्रश्न निर्माण होत आहे, सत्तेची खुर्ची महत्त्वाची की जनतेची सेवा?

लोकशाही व्यवस्थेत निवडून आलेला लोकप्रतिनिधी हा जनतेचा सेवक असतो. जनतेच्या समस्या समजून घेणे, विकासकामांना गती देणे, सर्वसामान्यांना न्याय मिळवून देणे आणि परिसरातील मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही त्याची प्राथमिक जबाबदारी असते. मात्र राजकारणाचे बदलते स्वरूप पाहता सेवाभावापेक्षा सत्तेचे राजकारण अधिक महत्त्वाचे ठरत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसते. निवडणुकीपूर्वी आश्वासनांचा पाऊस पाडला जातो; मात्र निवडणुकीनंतर त्याच आश्वासनांचे काय होते, याचा हिशेब जनतेला मिळत नाही.

आज गावागावांत रस्त्यांची समस्या आहे, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे, शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, तरुणांना रोजगाराच्या संधी मिळत नाहीत. आरोग्य आणि शिक्षणाच्या सुविधांबाबतही अनेक भागांत प्रश्न कायम आहेत. नागरिकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या दारात वारंवार जावे लागते. काही ठिकाणी निवेदने दिली जातात, आंदोलने होतात, तरीही प्रश्न मार्गी लागत नाहीत. मग जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींची जबाबदारी नेमकी काय, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. राजकारणात सत्तांतर होणे ही लोकशाहीची नैसर्गिक प्रक्रिया आहे. मात्र सत्तेसाठी होणारी पक्षांतरे, अंतर्गत गटबाजी, आरोप-प्रत्यारोप आणि पदांसाठी सुरू असलेली रस्सीखेच पाहिली की जनतेच्या प्रश्नांपेक्षा राजकीय स्वार्थ मोठा झाला आहे का, अशी शंका निर्माण होते. विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा होण्याऐवजी कोण कोणासोबत आहे, कोणाला कोणते पद मिळणार आणि कोणाची खुर्ची जाणार, याच चर्चांना अधिक महत्त्व दिले जाते. या राजकीय खेळात सामान्य माणसाच्या प्रश्नांचा आवाज मात्र दबला जातो.

विशेषतः ग्रामीण भागातील परिस्थिती अधिक गंभीर आहे. गावातील रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य केंद्रे आणि शैक्षणिक सुविधा या नागरिकांच्या मूलभूत गरजा आहेत. ग्रामपंचायत असो, पंचायत समिती असो, जिल्हा परिषद असो किंवा विधानसभा असो, प्रत्येक स्तरावरील लोकप्रतिनिधींनी या प्रश्नांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. विकासकामांचे फलक लावणे म्हणजे विकास नव्हे, तर त्या कामांचा प्रत्यक्ष लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे म्हणजे खरा विकास होय. सत्तेची खुर्ची मिळविण्यासाठी जनतेसमोर अनेक आश्वासने दिली जातात. मात्र खुर्ची मिळाल्यानंतर ती टिकविण्यासाठीच संपूर्ण वेळ खर्च होत असेल, तर जनतेच्या प्रश्नांसाठी वेळ कधी मिळणार? सत्ता ही जनतेच्या विश्वासातून मिळते आणि त्या विश्वासाचे रूपांतर कामातून झाले पाहिजे. केवळ भाषणे, जाहिराती, सत्कार समारंभ आणि उद्घाटने यांमधून लोकप्रतिनिधींची जबाबदारी पूर्ण होत नाही. जनतेच्या अडचणीच्या काळात तिच्या पाठीशी उभे राहणे, हेच खऱ्या नेतृत्वाचे लक्षण आहे.

राजकारणात मतभेद असणे गैर नाही. उलट लोकशाहीत विरोधी विचारांचे महत्त्व मोठे आहे. मात्र राजकीय मतभेदांमुळे विकासकामे थांबणे, नागरिकांची कामे प्रलंबित राहणे आणि जनतेच्या हितापेक्षा पक्षीय स्वार्थाला प्राधान्य मिळणे ही निश्चितच चिंतेची बाब आहे. सत्ता कोणाचीही असो, विकास हा सर्वसामान्य नागरिकांचा अधिकार आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांनी एकमेकांवर आरोप करण्यापेक्षा जनतेच्या प्रश्नांवर एकत्र येण्याची गरज आहे. नागरिकांनीही आता केवळ आश्वासनांवर विश्वास ठेवून चालणार नाही. निवडणुकीच्या वेळी उमेदवाराला प्रश्न विचारले पाहिजेत. मागील कामांचा लेखाजोखा मागितला पाहिजे. गावाचा विकास, रोजगार, शिक्षण, आरोग्य, पाणी आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर त्यांची भूमिका काय आहे, हे तपासले पाहिजे. लोकशाहीत मतदान हा केवळ अधिकार नाही, तर योग्य नेतृत्व निवडण्याची मोठी जबाबदारीदेखील आहे. आज देशाला, राज्याला आणि गावागावांना खुर्ची टिकविणारे राजकारणी नव्हे, तर जनतेच्या विश्वासाला पात्र ठरणारे सेवाभावी नेतृत्व हवे आहे. पद किती मोठे आहे यापेक्षा त्या पदावर असताना केलेले काम किती मोठे आहे, यावर लोकप्रतिनिधींची खरी ओळख ठरली पाहिजे. कारण खुर्ची कायमस्वरूपी नसते; आज सत्ता आहे, उद्या नसेल. मात्र जनतेसाठी केलेले प्रामाणिक काम आणि मिळिवलेला विश्वास कायम स्मरणात राहतो. शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, सत्तेची खुर्ची ही जनतेच्या सेवेसाठी असते, जनतेवर राज्य करण्यासाठी नाही. खुर्चीवर बसल्याने कोणी मोठे होत नाही, तर त्या खुर्चीवर बसून केलेल्या जनहिताच्या कामामुळे माणूस मोठा होतो. राजकारण हे सत्तेचे साधन न बनता समाजसेवेचे माध्यम झाले पाहिजे. कारण जनतेने प्रतिनिधींना खुर्ची दिलेली असते ती स्वतःचे भविष्य घडविण्यासाठी नव्हे, तर जनतेचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी. त्यामुळे प्रत्येक लोकप्रतिनिधीने स्वतःला एक प्रश्न नक्की विचारावा...

'माझ्यासाठी सत्तेची खुर्ची महत्त्वाची आहे की मला निवडून देणाऱ्या जनतेची सेवा?' या प्रश्नाचे उत्तरच खऱ्या लोकशाहीची दिशा ठरविणार आहे.

राजकारणापासून सामाजिक जीवनापर्यंत अनेक ठिकाणी स्वार्थ आणि प्रतिष्ठेची स्पर्धा दिसते. पद मिळिवण्यासाठी धडपड केली जाते; मात्र त्या पदाचा उपयोग समाजाच्या भल्यासाठी किती होतो, याचा विचार आवश्यक आहे. सार्वजनिक जीवनात असलेल्या प्रत्येक व्यक्तीने समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. समाजासाठी केलेले काम, गरजूंच्या मदतीसाठी पुढे केलेला हात आणि सामान्य माणसाच्या चेहऱ्यावर आणलेले समाधान हीच खरी श्रीमंती आहे. तर त्या कामांचा प्रत्यक्ष लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे म्हणजे खरा विकास होय. सत्तेची खुर्ची मिळिवण्यासाठी जनतेसमोर अनेक आश्वासने दिली जातात. मात्र खुर्ची मिळाल्यानंतर ती टिकविण्यासाठीच संपूर्ण वेळ खर्च होत असेल, तर जनतेच्या प्रश्नांसाठी वेळ कधी मिळणार? सत्ता ही जनतेच्या विश्वासातून मिळते आणि त्या विश्वासाचे रूपांतर कामातून झाले पाहिजे.

शिक्षक आमदार निवडणुकीचे आत्मपरीक्षण व्हावे



नवनिर्वाचित आमदारांनी शिक्षकांचे प्रश्न सोडवावेत! २३ ऑक्टोबर २०२६ रोजी अमरावती विभागीय शिक्षक मतदारसंघाची विधान परिषद निवडणूक पार पडली, तर २७ ऑक्टोबर रोजी निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. या निवडणुकीत विविध शिक्षक संघटनांसह राजकीय पक्षांनी आपापले उमेदवार रिंगणात उतरवले होते. मात्र, निवडणुकीचा निकाल अनपेक्षित लागल्याने नेमकी बाजी कोण मारणार, याचा अंदाज अनेकांना बांधता आला नाही. या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचे आता शिक्षकांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज निर्माण झाली आहे.

वास्तविक पाहता, शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करणाऱ्या शिक्षक संघटनांच्या उमेदवारांना प्राधान्य मिळणे अपेक्षित होते. रणरागिणी सौ. संगीताताई शिंदे, शेखर भाऊ भुयार, दिलीप भाऊ कडू यांच्यासारखे अनुभवी आणि शिक्षकांच्या प्रश्नांची जाण असलेले उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असताना अमरावती जिल्ह्यातील उमेदवारांना अपेक्षित यश मिळू शकले नाही. अमरावती जिल्ह्यातून अनेक उमेदवार निवडणुकीला उभे राहिल्याने मतांचे विभाजन झाले आणि त्याचा फायदा इतर जिल्ह्यांतील उमेदवारांना झाला, ही बाबही गांभीर्याने विचार करण्यासारखी आहे.

या निवडणुकीत पैशांचा वापर, पैठण्यांचे वाटप, विविध प्रकारच्या पार्ट्या आणि आमिषे दाखवून मतदान मिळिवण्याचे प्रकार झाल्याच्या चर्चा शिक्षकांमध्ये सुरू आहेत. विनाअनुदानित शाळांमध्ये जाऊन मतदारांवर प्रभाव टाकणे, संस्थाचालकांना विविध आश्वासने देणे तसेच शाळांमध्ये प्रतिनिधी पाठवून मतदानासाठी प्रयत्न करणे, असे प्रकार घडल्याचे अनुभव काही शिक्षकांनी व्यक्त केले आहेत. माझ्या शाळेतही अशा प्रकारे प्रतिनिधी पाठवून मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न झाल्याचा अनुभव आला आहे. त्यामुळे शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत वैचारिक भूमिका आणि शिक्षकांच्या प्रश्नांपेक्षा आर्थिक ताकदीला अधिक महत्त्व मिळत असल्याची खंत वाटते.

शिक्षक आमदार हा शासनाच्या सत्तेच्या जवळ असण्यापेक्षा शिक्षकांच्या प्रश्नांसाठी शासनावर दबाव निर्माण करणारा असावा. संचमान्यता, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन, जुनी पेन्शन योजना, विनाअनुदानित शाळांचे प्रश्न, वेतनेतर अनुदान, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समस्या तसेच शाळांच्या विविध प्रशासकीय अडचणी यांसाठी शासन दरबारी ठामपणे आवाज उठविणारा प्रतिनिधी शिक्षकांना अपेक्षित आहे. मात्र, शिक्षकांच्या मूलभूत प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची भावना शिक्षकांमध्ये निर्माण झाली आहे.

आज मुख्याध्यापकांना शिक्षणाधिकारी कार्यालयात विविध कामांसाठी जाताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. संचमान्यता, वेतन, अनुदान, मान्यता आणि इतर प्रशासकीय बाबींमध्ये शाळांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. या समस्यांकडे लक्ष देऊन त्या तातडीने निकाली काढण्यासाठी शिक्षक आमदारांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

नवनिर्वाचित आमदारांचे निवडून आल्याबद्दल सर्वप्रथम अभिनंदन! आपण आता शासनाच्या सत्तेत सहभागी असल्याने शिक्षकांच्या सर्व समस्या सोडविण्याची मोठी जबाबदारी आपल्यावर आहे. त्यामुळे केवळ निवडणुकीच्या काळात शाळांना भेटी देण्याऐवजी पुढील सहा वर्षे शिक्षकांच्या प्रश्नांसाठी ठोस काम करावे. पेन्शन योजना, संचमान्यता, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन, विनाअनुदानित शाळांचे अनुदान, वेतनेतर अनुदान आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या शासनाकडून मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत.

शिक्षक संघटनांची होत असलेली विभागणी हीदेखील चिंतेची बाब आहे. संघटनांचे कार्यकर्ते शाळेतील अध्यापनाचे काम सोडून निवडणूक प्रचारात गुंततात. सुट्ट्या घेऊन प्रचारासाठी फिरतात. मात्र, या सर्व प्रक्रियेतून शाळा आणि विद्यार्थ्यांचे नेमके काय हित साधले जाते, हा प्रश्न उपस्थित होतो. पैशांचा अपव्यय, वेळेचा गैरवापर आणि शिक्षकांना होणारा मनस्ताप टाळण्यासाठी शिक्षक संघटनांनी एकत्र येऊन भविष्यात योग्य दिशा ठरविणे आवश्यक आहे.

अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांतील शिक्षकांनी आता जागरूक होण्याची गरज आहे. शिक्षकांचा खरा प्रतिनिधी कोण, शिक्षकांच्या प्रश्नांसाठी कोण सातत्याने लढतो आणि शासन दरबारी कोण ठामपणे भूमिका मांडतो, याचा विचार करूनच भविष्यात मतदान करणे आवश्यक आहे. अन्यथा पुढील सहा वर्षांतही शिक्षकांच्या समस्या प्रलंबित राहण्याची भीती नाकारता येत नाही.

नवनिर्वाचित शिक्षक आमदारांनी या निवडणुकीत मिळालेल्या विजयाचे शक्तिप्रदर्शन न करता शिक्षकांचा विश्वास संपादन करण्यासाठी काम करावे. शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समस्या प्राधान्याने सोडवून त्यांना न्याय द्यावा, हीच अपेक्षा आहे.

अविनाश मनोहर साळकर
मुख्याध्यापक / प्राचार्य
ग्रामविकास माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंबाडा, ता.मोर्शी

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

मतदारांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी संत्रानगरीत काँग्रेस-राष्ट्रवादीचे आंदोलन

'व्होट बचाओ - देश बचाओ' अभियानाला समर्थन : माजी कृषिमंत्री देशमुख यांची प्रमुख उपस्थिती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



वरुड – लोकशाही व्यवस्थेत मतदानाचा अधिकार अबाधित ठेवण्यासह निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्याच्या मागणीसाठी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली येथे सुरु असलेल्या 'व्होट बचाओ – देश बचाओ' अभियानाला समर्थन देण्यासाठी वरूड तहसील कार्यालयासमोर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने एकदिवसीय आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात माजी कृषिमंत्री हर्षवर्धन देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी लोकशाही मूल्यांचे रक्षण, मतदारांच्या मतदानाच्या अधिकारांचे संरक्षण तसेच निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता असण्याची आवश्यकता या महत्त्वपूर्ण मुद्दयांवरुन केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यात आले. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक मतदाराचा मतदानाचा अधिकार महत्त्वाचा असून निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष व पारदर्शक असणे गरजेचे असल्याची भूमिका आंदोलकांनी मांडली.

या आंदोलनात काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राहुल बोडखे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष राजेंद्र बहुरुपी, शहराध्यक्ष डॉ.प्रवीण चौधरी, अल्पसंख्याक सेलचे अब्दुल शरीफ शेख, माजी जिल्हा परिषद सदस्य गिरीश कराळे, रत्ना ढोले, माजी शहराध्यक्ष जितेन शाह, शैलेश देशमुख, यशवंत सराटकर, तंटामुक्त समिती माजी अध्यक्ष सोपान ढोले, काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष बाबाराव बहुरुपी, माजी पं.स.सभापती राजाभाऊ कुकडे, माजी नगरसेवक संजय डफरे, अनिल कनाटे, प्रज्ञा बोडखे,विजय यावले, प्रविणा बहुरुपी, रंजना मस्की, डॉ.गौस अली, विकास ठाकरे, जयंत मस्की, यांच्यासह दोन्ही पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दिल्ली येथे सुरु असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत वरुडमध्येही काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी एकजूट दाखविली. तहसील कार्यालयासमोर झालेल्या या आंदोलनातून लोकशाहीचे रक्षण आणि मतदारांच्या हक्कांच्या संरक्षणाचा मुद्दा ठामपणे उपस्थित करण्यात आला.

मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा आत्मा असून त्याचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचा संदेश या आंदोलनातून देण्यात आला.

राष्ट्रवादी अजित पवार गटात नाराजीचा स्फोट

उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या विरोधात तक्रारीचा सूर, देवगिरीवर आमदारांची बैठक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या आमदारांनी मंगळवारच्या बैठकीत संघटना आणि महायुतीतील घटक पक्षाकडून मिळणाऱ्या सापत्नभावाच्या वागणुकीबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. पक्षाच्या जेष्ठ नेत्यांमध्ये नेमके काय सुरू आहे, याची माहिती आम्हाला खालच्या स्तरापर्यंत मिळत नाही. त्यामुळे पक्ष कमजोर होत असल्याची स्पष्ट जाणीव काही आमदारांनी पक्ष नेतृत्वाला करून दिली .

पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि नव्या नेतृत्वात दुफळी मजल्याच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज, देवगिरी या शासकीय निवासस्थानी पक्षाच्या सर्व मंत्री, आमदार, खासदारांची बैठक बोलवली होती. पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ यांच्यासह ३५ च्या आसपास आमदार बैठकीला उपस्थित होते. बैठकीत पक्षबांधणीसह राज्यातील भीषण दुष्काळाच्या स्थितीवर चर्चा झाली. सुनील तटकरे यांनी आमदारांना दुष्काळी भागांचे दौरे करण्याच्या सूचना दिल्या. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना शासकीय पातळीवर मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. मतदारसंघात उत्तर देणे कठीण होतेय पक्ष सत्तेत सहभागी असूनही आमदारांची कामे होत नसतील, तर त्याचा परिणाम पक्षाच्या संघटनात्मक ताकदीवर होईल.

अप्पर वर्धा धरणाचे कालवे तात्काळ बंद करा

धरणग्रस्त शेतकऱ्यांचे आमदार उमेश यावलकर यांचेकडे साकडे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – अपर वर्धा धरणातील पाणी गेल्या काही दिवसांपासून कालव्याद्वारे सोडण्यात येत असल्याने धरणातील जलसाठ्यात मोठी घट झाली आहे. सध्या धरणात केवळ ४० टक्के पाणीसाठा शिल्लक असून बॅकवॉटरमधील पाणीही संपण्याच्या मार्गावर आहे.

त्यामुळे परिसरातील शेतकरी, नागरिक आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, त्यामुळे अप्पर वर्धा धरणाचे कालवे तात्काळ बंद करण्यात यावे, अशी मागणी धरणग्रस्त शेतकऱ्यांचे वतीने आमदार उमेश यावलकर यांचेकडे केली आहे.

लोणी, भापकी, पळसवाडा, बेलोरा, इत्तमगाव, अलोडा, शिंगोरी, ममदापूर आणि हातुर्णा या गावांतील शेतजमिनी अपर वर्धा धरणासाठी संपादित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे धरणाच्या पाण्यावर सर्वप्रथम या परिसरातील शेतकऱ्यांचा हक्क असल्याची भूमिका शेतकऱ्यांनी मांडली आहे. कालव्याद्वारे पाणी सोडणे सुरुच राहिल्यास नदीपात्रात पाण्याचा थेंबही शिल्लक राहणार नाही. परिणामी संत्रा, मोसंबी तसेच इतर पिके धोक्यात येतील. यासोबतच जनावरांच्या पिण्यासाठी आणि नागरिकांच्या वापरासाठीही पाणी उपलब्ध होणार नाही, अशी चिंता शेतकऱ्यांनी व्यक्त केली. या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन कालव्याद्वारे सुरू असलेला पाण्याचा विसर्ग तात्काळ बंद करण्यात यावा, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. रविवार १ नोव्हेंबर २०२६ रोजी हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी तालुका खरेदी विक्री संस्थेचे अध्यक्ष तुषार निकम, कृषि उत्पन्न बाजार बाजार समिती संचालक प्रवीण मानकर, अजय काचरे, चंद्रशेखर पावडे, अशोक ताथोडे, माजी सरपंच स्वप्नील खांडेकर, माजी उपसरपंच सतीश चौधरी, राजेंद्र ताथोडे, अरुण पावडे, मधुकर मनोटे, कैलास वानखडे, राजेंद्र शहाणे, माजी सरपंच विलास सोनारे, निकेश ताथोडे, धनराज चौधरी, मंथन पावडे, सतीश ताथोडे, जगदीश पाटणे, गणेश उईके, राजेश पावडे, शुभम पावडे आणि आशिष पावडे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



वरुड : वरुड : शासकीय कंत्राटदार रोशन कळमकर यांना वाढदिवसाच्या पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देताना नगरसेवक निलेश फुटाणे, युवा व्यावसायिक अमित खेरडे, संजय राऊत, उमेश गेटमे.



वरुड : शासकीय कंत्राटदार रोशन कळमकर यांना वाढदिवसाच्या पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देताना प्रसिध्द स्त्री रोग व प्रसुती तज्ञ डॉ.मनोहर आंडे, जायंटस गृप ऑफ वरुडचे माजी अध्यक्ष नितीन खेरडे, विवेक बुरे, प्रेम मिश्रा, आयुर्वेदाचार्य डॉ.चरण सोनारे, महेश बोरकूटे, नरेंद्र काळे, रामभाऊ राऊत, हरिहर वरुडकर यांचेसह हरी सेवा फाऊंडेशनचे सर्व पदाधिकारी.

न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये 'सुरक्षित बचपन अभियान'

विद्यार्थ्यांना बालकांच्या संरक्षण कायद्यांविषयी मार्गदर्शन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



वरुड – जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका विधी सेवा समिती यांच्या वतीने न्यू इंग्लिश हायस्कूल येथे 'सुरक्षित बचपन अभियान' अंतर्गत कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी विद्यार्थ्यांना बालकांचे लैंगिक शोषण रोखणे, त्यांचे कायदेशीर अधिकार आणि संरक्षणासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए.ए.पंचभाई होते. प्रमुख अतिथी म्हणुन दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व्ही.व्ही.राजुरकर, तालुका वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड.पी.जे.खासबागे, गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे, मुख्याध्यापक अशोक चौधरी उपस्थित होते.

कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांना बालकांच्या सुरक्षिततेसाठी असलेल्या कायदेशीर तरतुदी, बालकांचे हक्क, लैंगिक अत्याचारापासून संरक्षण तसेच अनुचित प्रसंग घडल्यास घाबरुन न जाता पालक, शिक्षक किंवा विश्वासू व्यक्तींशी संपर्क साधण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

अध्यक्षीय मार्गदर्शनातून ए.ए.पंचभाई यांनी बालकांच्या सुरक्षिततेचे महत्त्व अधोरेखित करत बालकांवरील अत्याचार रोखण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसून समाजातील प्रत्येक घटकाने सजग आणि जबाबदार राहणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागरुकता निर्माण करणे, त्यांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करुन देणे आणि बालसुरक्षेबाबत संवेदनशील बनविणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन प्रमोद केने व आभार प्रमोद केने यांनी मानले.

दोन वर्षांपासून ट्रान्सफॉर्मरचे काम रखडले : शेतकरी वीजपुरवठ्याअभावी त्रस्त!

ट्रान्सफॉर्मर नवीन जागी बसवुन १५ नोव्हेंबरपर्यंत काम पूर्ण करण्याची शेतकऱ्यांची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





वरुड – मौजा लिंगा येथील शेतकऱ्यांना वीजपुरवठ्याच्या समस्येला गेल्या अनेक महिन्यांपासून सामोरे जावे लागत असून, महावितरण विभागाच्या कथित दिरंगाईमुळे परिसरातील ४० ते ४५ शेतकरी त्रस्त झाले आहेत. बंद पडलेला ट्रान्सफॉर्मर तातडीने सुरु करावा, तसेच नवीन ट्रान्सफॉर्मर शेताबाहेरील रस्त्यालगत बसवावा आणि दोन वर्षांपासून रखडलेले नवीन ट्रान्सफॉर्मरचे काम पूर्ण करावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, लिंगा येथील रोशन कळंबे यांच्या शेतात सध्या ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आलेला आहे. मात्र, या ट्रान्सफॉर्मरच्या देखभाल व दुरुस्तीकरिता शेतातून ये-जा करताना शेतीमालाचे तसेच संत्र्याच्या झाडांचे नुकसान होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. त्यामुळे सदर ट्रान्सफॉर्मर शेताबाहेर रस्त्यालगत हलविण्यात यावा, अशी मागणी संबंधित विभागाकडे वारंवार करण्यात आली. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

विशेष म्हणजे, सदर ट्रान्सफॉर्मर मागील दोन महिन्यांपासून बंद असल्याने परिसरातील शेतकऱ्यांचा वीजपुरवठा विस्कळीत झाला आहे. या समस्येबाबत पुसला येथील अभियंता तसेच वरुड येथील अभियंत्यांना प्रत्यक्ष भेटून माहिती देण्यात आली. अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी सुद्धा केली मात्र अद्याप प्रश्न मार्गी लागला नाही. दरम्यान, यापूर्वी सुमारे ४० ते ४५ शेतकऱ्यांना एकाच ट्रान्सफॉर्मरवरुन वीजपुरवठा केला जात होता. त्यामुळे ट्रान्सफॉर्मरवर अतिरिक्त भार येत असल्याने नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम मंजूर करण्यात आले होते. मात्र, मागील दोन वर्षांपूर्वी या कामाला सुरुवात होऊन काही पोल, विद्युत तार व ट्रान्सफॉर्मरचे स्ट्रक्चर उभारण्यात आले असले तरी कंत्राटदाराने अद्याप काम पूर्ण केलेले नाही. परिणामी, मंजूर काम अपूर्ण अवस्थेत पडून आहे. या संदर्भात संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा करुनही समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. फोनद्वारे संपर्क साधल्यास मोर्शी येथे जाऊन विचारणा करण्याचे सांगितले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मागील दोन वर्षांपासून अपूर्ण असलेले ट्रान्सफॉर्मरचे स्ट्रक्चर व इतर विद्युत काम १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात यावे अन्यथा मागण्या पूर्ण न झाल्यास २० नोव्हेंबर २०२६ रोजी पुसला येथील पंढरी मध्य प्रकल्प परिसरात सर्व शेतकरी एकत्र येऊन तीव्र आंदोलन छेडणार असल्याचा ईशारा बाबाराव घाटोडे, गुणवंत घाटोडे, भगवंत सांबारे, अक्षय बिडकर, रमेश्वर ठोंबरे, किशोर घाटोडे, विनोद कळंबे, संजय कळंबे, सचिन बेंडे, सचिन कळंबे, दिवाकर मेवलिया, गुलाब मेवलिया, रुपराव बांदरे, शरद पिकले, गोपाल भडके, सुरेंद्र ठोंबरे, लोचनसिंग ठाकूर, दामोदर शेळके, रवींद्र कुरवाडे, रामदास कुरवाडे, गणेश मेवले, पनजु सरोदे, ऋषिकेश बिडकर, भास्कर नासरे, रमेश मेवलिया, भाऊराव शेळके, अशोक नासरे, विनोद घाटोडे, जगदीश शेळके, पद्माकर शेळके, रामदास भडके, प्रवीण कळंबे, कमलेश कळंबे, सुगंधा कळंबे, विष्णू नासरे, बंडू मुलमुले, नरेंद्र नासरे, योगीरा परमार, सुरेंद्र कुरवाडे, राजेंद्र शेळके, गजानन नांदणे, संजय शेळके, स्वप्निल बेंडे, पार्वती नांदणे यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे.

कांद्याच्या रेल्वे वाहतुकीत २९ टक्क्यांपर्यंत कपात! रेल्वे बोर्डाच्या निर्णयाचे कांदा उत्पादक शेतकरी संघटनेकडून स्वागत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

लासलगाव – कांद्याच्या रेल्वे वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या बंदिस्त मालवाहू व एअर ब्रेक प्रणाली असलेल्या बंदिस्त मालवाहू डब्यांची अनुमत वहन क्षमता ४५ टन निश्चित करण्याचा निर्णय भारतीय रेल्वे बोर्डाने घेतला आहे. या निर्णयामुळे कांद्याच्या रेल्वे वाहतूक भाड्यात सुमारे २९ टक्क्यांपर्यंत कपात होण्याची शक्यता असून, कांदा व्यापारी, निर्यातदार आणि उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. रेल्वे बोर्डाने २३ ऑक्टोबर रोजी यासंदर्भातील सुधारित आदेश जारी केला असून, २८ ऑक्टोबरपासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. ही सुधारित व्यवस्था २७ ऑक्टोबर २०२७ पर्यंत लागू राहणार आहे. यापूर्वी कांदा वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या एका प्रकारच्या बंदिस्त वॅगनची अनुमत वहन क्षमता ५९.८ ते ६१.४ टन, तर एअर ब्रेक प्रणाली असलेल्या बंदिस्त वॅगनची क्षमता ६२.४ ते ६४ टन इतकी होती. आता या दोन्ही प्रकारच्या वॅगनची अनुमत वहन क्षमता ४५ टन निश्चित करण्यात आली आहे. याशिवाय एक टन अतिरिक्त भार सहनशीलतेची तरतूदही करण्यात आली आहे. त्यामुळे कांद्याच्या वाहतुकीसाठी आकारण्यात येणाऱ्या भाड्यात सुमारे २९ टक्क्यांपर्यंत कपात होण्याची अपेक्षा आहे.

निर्यात थांबली, मात्र 'शामा'ची जादू कायम : जळगावच्या फटाक्यांना मध्यपूर्वेतूनही होती मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



जळगाव – दिवाळी आणि फटाके यांचे अतूट नाते आहे. दिवाळी असो, लग्नसमारंभ असो किंवा अन्य कोणताही आनंदोत्सव, फटाक्यांच्या आतषबाजीशिवाय उत्सवाला पूर्णत्व येत नाही.

जळगावकरांसाठी फटाके म्हटले की आजही 'शामा फायर' हे नाव आवर्जून घेतले जाते. १९५० मध्ये जळगावात सुरू झालेल्या या फटाक्यांच्या कारखान्याची ख्याती केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नव्हती, तर देशातील विविध राज्यांसह आफ्रिका आणि मध्यपूर्वेतील देशांमध्येही शामा फायरच्या फटाक्यांना मोठी मागणी होती. याचा उल्लेख शासनाच्या गॅझेटमध्येही आढळतो.

काळाच्या ओघात निर्यात थांबली असली, तरी जळगावकरांच्या मनातील या ब्रँडचे स्थान आजही कायम आहे. भारतात प्राचीन काळापासून राजे-महाराजांच्या उत्सवांमध्ये दारूकाम आणि आतषबाजी केली जात असल्याचे संदर्भ आढळतात. मात्र, फटाक्यांची व्यावसायिक निर्मिती आणि विक्रीचे स्वरूप नंतर विकसित झाले.

चीनने फटाक्यांच्या व्यावसायिक विक्रीचे तंत्र विकसित केले आणि साधारण १९५० च्या दशकात भारतातही फटाक्यांचे उत्पादन व विक्री मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. जळगावमध्ये खान्देश मिलनंतर १९५० मध्ये सुरू झालेली शामा फायर वर्क्स ही फटाके निर्मिती करणारी महत्त्वाची कंपनी ठरली.

आज जळगावच्या जी. एस. मैदानावर फटाक्यांचे स्टॉल लागतात आणि अनेक विक्रेते उपलब्ध आहेत. तरीही शामा फायरकडे ग्राहकांची पावले वळतात.

भुलाबाई उत्सवात वरुडच्या योगा ग्रुपचा डंका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

प्रथम क्रमांक पटकावुन यशाची परंपरा कायम



वरुड – पालवी फाऊंडेशन अमरावती यांच्या वतीने आयोजित भुलाबाई उत्सव २०२६ मध्ये योगा ग्रुप वरुडने आपल्या उत्कृष्ट सादरीकरणाच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत तब्बल १४ संघ सहभागी झाले होते. पारंपरिक भुलाबाईची गीते, आकर्षक वेशभूषा आणि उत्स्फूर्त सादरी करणाच्या जोरावर योगा ग्रुपने परीक्षकांची मने जिंकली.

आजच्या आधुनिक युगात पारंपरिक लोकगीते आणि लोककला लोप पावत असताना आपल्या वर्हाडी लोकसंस्कृतीचा वारसा जपण्याच्या उद्देशाने पालवी फाऊंडेशनच्या अध्यक्षा पल्लवी यादगिरे वैद्य यांनी भुलाबाई उत्सवाचे भव्य आयोजन केले. त्यांच्या या सांस्कृतिक उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.


योगा ग्रुपच्या १२ महिलांनी या स्पर्धेसाठी सलग १५ दिवस मेहनत घेत विशेष सराव केला. घरगुती जबाबदाऱ्या, नोकरी आणि दैनंदिन कामे सांभाळून पहाटेपासून भुलाबाईच्या पारंपरिक गीतांचा सराव करण्यात आला. बालपणीच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी सर्व महिलांनी पारंपरिक फ्रॉक परिधान करुन आकर्षक केशभूषा व वेशभूषेतून बालपणीचा आनंद पुन्हा अनुभवला. विशेष म्हणजे योगा ग्रुपने सलग दुसऱ्या वर्षी या स्पर्धेत सहभाग नोंदवून यशाची परंपरा कायम राखली आहे. लोकसंस्कृतीचे संवर्धन आणि महिलांच्या सांघिक प्रयत्नांना मिळालेले हे यश कौतुकास्पद ठरत आहे. या यशस्वी संघात डॉ.मीना बंदे, निलीमा मालपे, माधुरी आंडे, पदमा बुवाडे, प्रतिभा लोखंडे, डॉ.सोनाली आंडे, किर्ती खोडे, अंजली वानखडे, गायत्री देवते, हिमानी आजनकर, पल्लवी शिरभाते आणि शैलजा लोखंडे गोरडे यांचा सहभाग होता.

मोर्शीत 'सुरक्षित बचपन अभियान'

विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





मोर्शी – तालुका विधी सेवा समितीचा पुढाकार; बालहक्क आणि बालसुरक्षेबाबत जनजागृती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावती यांच्या सूचनेनुसार दिवाणी व फौजदारी न्यायालय, मोर्शी अंतर्गत तालुका विधी सेवा समितीच्या वतीने २६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सुरक्षित बचपन अभियान' राबविण्यात आले. या अभियानांतर्गत मोर्शी तालुक्यातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांना बालसुरक्षा, बालहक्क आणि सुरक्षित बालपणाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या अभियानाची सुरुवात २६ ऑक्टोबर रोजी स्व. अन्नासाहेब कानफाडे स्मृती विद्यालय, मोर्शी येथे झाली. २७ ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, येरला येथे, २८ ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा व जिल्हा परिषद कन्या शाळा, नेरपिंगळाई येथे, तर २९ ऑक्टोबर रोजी झेनिथ कॉन्व्हेंट, तळणी येथे अभियान राबविण्यात आले. ३० ऑक्टोबर रोजी सरस्वती विद्यालय, खानापूर येथे आणि ३१ ऑक्टोबर रोजी जिजामाता विद्यालय, मोर्शी येथे या अभियानाचा समारोप झाला.

या उपक्रमादरम्यान मोर्शी न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश जी.डी.गुरनुले, दिवाणी व फौजदारी न्यायाधीश, मोर्शी तसेच सह दिवाणी व फौजदारी न्यायाधीश राघवेंद्र एन. देव यांनी मार्गदर्शन केले. यासोबतच मोर्शी बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.जयंत ढोले, ॲड.मंजुषा खांडेकर, ॲड.भावना राऊत, ॲड.हर्षा बाळसराफ, ॲड.विजय घोडकी, ॲड.विशाल काळे आणि ॲड.प्रफुल्ल कंगाले यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षित बचपन अभियानाचे महत्त्व समजावून सांगितले.

यावेळी संबंधित शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षकवृंद उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये बालसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे, त्यांना आपल्या हक्कांची जाणीव करून देणे आणि सुरक्षित वातावरणात बालपण जगण्याचे महत्त्व पटवून देणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश होता.

राम पूर्णेकरांना संरक्षण द्या! मीनाक्षी शिंदेंचे पोलीस आयुक्तांना पत्र : प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरणाला नवे वळण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



ठाणे – ठाण्यातील मानपाडा परिसरात शिवसेना ठाकरे गटाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्या प्रकरणावरून शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या हत्येमागे माजी महापौर मीनाक्षी शिंदे आणि त्यांचे पती प्रदीप शिंदे हेच सूत्रधार असल्याचा आरोप पूर्णेकर कुटुंबीयांसह विरोधी पक्षांकडून करण्यात येत आहे. त्यांच्या अटकेच्या मागणीसाठी आंदोलनेही करण्यात आली आहेत. मात्र, आता या प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, मीनाक्षी शिंदे यांनीच पोलीस आयुक्तांना पत्र लिहून दिवंगत प्रदीप पूर्णेकर यांचे पुत्र राम पूर्णेकर आणि त्यांच्या निकटवर्तीयांना पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रतिमा मलिन करण्यासाठी विरोधकांकडून कटकारस्थाने रचली जात असल्याचा दावाही त्यांनी केला. जनतेमध्ये खोटी आणि दिशाभूल करणारी माहिती पसरवली जात असून, समाजमाध्यमांचा गैरवापर केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. दिवंगत प्रदीप पूर्णेकर यांचे पुत्र राम पूर्णेकर आणि त्यांचे कुटुंबीय सध्या दुःखातून सावरण्याचा प्रयत्न करत आहेत.

अशा भावनिक आणि संवेदनशील परिस्थितीत विरोधक या कुटुंबाचा राजकीय फायद्यासाठी वापर करत असल्याचा आरोप मीनाक्षी शिंदे यांनी केला.

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.१०११/२०२६ ने.ता.१६/१२/२०२६

अर्जदार :-

प्रदिप कृष्णराव सातपुते

वय अं.५२ वर्ष, धंदा-शेती

रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- निरंक (कोणीही नाही)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत कृष्णराव सदाशिवराव सातपुते व मयत सुमन कृष्णराव सातपुते, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०३/११/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.७११/२०२६ ने.ता.२९/०९/२०२६

अर्जदार :-

१) साहेबराव रामकृष्ण अधव, वय अं.४९ वर्ष, धंदा-नोकरी

२) सुभद्रा रामकृष्ण अधव, वय अं.६० वर्ष, धंदा-गृहिणी

दोघेही रा.राजुरा रोड, वार्ड क्र.१ वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत रामकृष्ण बापुराव अधव रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२९/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०१/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९९२/२०२६ ने.ता.१७/१२/२०२६

अर्जदार :-

महादेव कृष्णाजी मारबदे

वय अं.७९ वर्ष, धंदा-शेती

रा.अजितपुर भापकी, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- निरंक (कोणीही नाही)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत किसनराव उर्फ कृष्णाजी लखुजी मारबदे, रा.अजितपुरा भापकी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०४/११/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.१००६/२०२६ ने.ता.१७/१२/२०२६

अर्जदार :- १) चिंतामण देवराम डोंगरे, वय अं.७८ वर्ष, धंदा-आराम, २) बिसन देवराम डोंगरे, वय अं.४८ वर्ष, धंदा-आराम, ३) मोतिराम देवराम डोंगरे, वय अं.७६ वर्ष, धंदा-आराम, ४) हिराबाई वामन बागडे, वय अं.६० वर्ष, धंदा-घरकाम, रा.रामपुरी, ता.नरखेड, ५) मिलींद किसनाजी डोंगरे, वय अं.४२ वर्ष, धंदा-मजुरी, रा.अमरावती सिव्ही लाईन, ता.जि.अमरावती, ६) धिरज हरिदास डोंगरे, वय अं.३६ वर्ष, धंदा-मजुरी, क्र.१ ते ३ व ६ रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- निरंक (कोणीही नाही)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत राधाबाई देवराव डोंगरे, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०२/११/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड



दुष्काळी परिस्थिती, घरात गरोदर महिला, तरीही फायनान्स कंपनीनं घराबाहेर काढलं

मनमानी कारभाराविरोधात अमरावतीत शिवसेनेचा आक्रमक पवित्रा, तीन घरांच्या कुलूपावर हातोडा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



अमरावती – फायनान्स कंपनीच्या मनमानीवर दर्यापुर आणि धामणगाव रेल्वेत शिवसेनेनं आक्रमक पवित्रा घेत हातोडा कारवाई केली आहे. फायनान्स कंपनीने कर्ज थकले म्हणून सील केलेल्या तीन घराचे कुलूप शिवसेनेने तोडले आहे. दरम्यान, दिवाळीपूर्वी घर मिळाल्याने पीडित कुटुंबाच्या चेहेऱ्यावर हसू फुलले आहे. मात्र दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर फायनान्स कंपनीच्या मनमानीचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कर्जाचे हप्ते थकले म्हणून कुटुंबाला घराबाहेर काढून घराला सील ठोकणाऱ्या फायनान्स कंपनीच्या मनमानी कारभाराविरोधात दर्यापुर शहरातील आणि धामणगाव रेल्वे तालुक्यातील जळका पटाचे येथील फायनान्स कंपनीने शेतकरी कुटुंबाचे घर सील केले होते.

यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे व्यवसाय ठप्प झाल्याने आणि हाताला काम नसल्याने त्यांचे हप्ते थकले. याचा फायदा घेत फायनान्स कंपनीने गुंड प्रवृत्तीच्या लोकांना पाठवून त्या कुटुंबाला जबरदस्तीने घराबाहेर काढले आणि घराला कुलूप लावून सील केले. या कृत्यामुळे ते संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले. विशेष म्हणजे राज्य शासनाने दुष्काळी परिस्थिती पाहता कर्ज वसुलीला स्थगिती देणारा जी.आर. काढला असतानाही कंपनीने ही मुजोरी केली.

'मला काही झाल्यास सासू जबाबदार': मृत्यूपूर्वी पायल झांबरेचा मेसेज, हुंड्यासाठी छळ केल्याचा माहेरच्यांचा आरोप

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



पुणे – पुण्यातील मुकुंदनगर परिसरात २९ वर्षीय आयटी इंजिनिअर विवाहितेचा संशयास्पद मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे.

पायल झांबरे असे मृत महिलेचे नाव असून, तिचा सासरच्या मंडळींकडून छळ होत असल्याचा आरोप माहेरच्या कुटुंबीयांनी केला आहे. पायल ही पुण्यातील प्रसिद्ध झांबरे पॅलेसच्या मालकांच्या कुटुंबातील सून असल्याची माहिती आहे. सासरच्या छळाला कंटाळून तिने आत्महत्या केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, पायल आत्महत्या करू शकत नाही, तिचा घातपात झाला असावा, असा दावा तिच्या नातेवाईकांनी केला आहे. पायलच्या माहेरच्या कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीनुसार, लग्नानंतर तिचा पती आणि सासरच्या मंडळींकडून मानसिक तसेच शारीरिक छळ केला जात होता.

दोन विद्युत मोटर चोरटे पोलिसांच्या ताब्यात

दोघेही कुरळी येथील रहिवाशी : आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – पोलीस स्टेशन वरुड हद्दीतील भांडोली शेतशिवारात शेतकऱ्यांच्या विहिरीवरील विद्युत मोटारी व केबल चोरीच्या गुन्ह्याचा तपास करतांना वरुड पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली. पोलिसांनी चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती दिली आहे. या प्रकरणी फिर्यादी शेख अकबर शेख रज्जाक, (६१) यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वरुड पोलीस स्टेशन येथे अज्ञाता विरुध्द चोरीचा गुन्हा नोंदविण्यात आला होता. शेतातील विद्युत मोटार व केबल अज्ञात व्यक्तींनी चोरुन नेल्याचे तक्रारीत नमुद आहे. या प्रकरणी ठाणेदार दिनेश चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली वरुड पोलिसांनी आरोपीचा शोध घेतला असता तपासा दरम्यान ईश्वर उर्फ पप्पू पंजाबराव पंचमुळे (२४) व अंकुश विठ्ठलराव ढवळे (२९) दोन्ही रा.कुरळी ता.वरुड या दोघांना अटक करण्यात आली. गुन्ह्यातील विद्युत मोटारी व केबल हस्तगत करण्यात आल्या असून पुढील तपास वरुड पोलीस करीत आहेत.

महाराष्ट्राच्या सागरी हद्दीत घुसखोरी : कर्नाटकची 'सुलतान' नौका जप्त, तांडेलसह ७ खलाशी ताब्यात



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

देवगड – महाराष्ट्राच्या सागरी हद्दीत बेकायदा मासेमारी करणाऱ्या कर्नाटकातील 'सुलतान' या ट्रॉलर नौकेवर मत्स्यव्यवसाय विभागाने कारवाई केली. २ नोव्हेंबरच्या मध्यरात्री देवगडसमोरील समुद्रात ही नौका जप्त करण्यात आली असून, तांडेलसह सात खलाशांना ताब्यात घेण्यात आले आहे. मुणगे किनाऱ्यापासून पाच ते सहा नॉटिकल मैल अंतरावर ही नौका वैध परवान्याशिवाय ट्रॉलिंग पद्धतीने मासेमारी करताना आढळली. गस्ती नौका दिसताच तिने पळून जाण्याचा प्रयत्न केला. 'सुलतान'चा परवाना केवळ विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (एएन) वैध असल्याची माहिती विभागाने दिली. महाराष्ट्राच्या सागरी हद्दीत मासेमारीचा अधिकार नसतानाही नौका येथे मासेमारी करत असल्याचे समोर आले आहे.

आंदोलन स्थळी अमर्याद काळ ठिय्या नको

इतरांनाही निदर्शनांचा घटनात्मक अधिकार, सुप्रीम कोर्टाचे निरीक्षण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



नवी दिल्ली – कोणतीही व्यक्ती, गट किंवा संघटना कोणत्याही आंदोलनाच्या ठरवलेल्या जागेवर अमर्याद काळासाठी ठिय्या देऊ शकत नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी नोंदवले. इतर नागरिकांनाही त्याच सार्वजनिक जागेवर आपली निदर्शने, आंदोलने करण्याचा समान घटनात्मक अधिकार आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या.जॉयमाल्या बागची आणि न्या.व्ही.मोहना यांच्या खंडपीठाने हे निरीक्षण नोंदवले. 'कॉकरोच जनता पार्टी'च्या (सीजेपी) नेतृत्वाखाली जुलै महिन्यात झालेल्या आंदोलनांदरम्यान झालेल्या पोलीस कारवाईविरोधातील याचिकांवर सुनावणी सुरू असताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदविले आहे.

आंदोलनांमुळे व्यापाऱ्यांचे होतेय नुकसान सुनावणीदरम्यान 'किराणा कमिटी दिल्ली' आणि इतर व्यापारी संघटनांचे वरिष्ठ वकील मुकुल रोहतकी यांनी सांगितले की, आंदोलनांमुळे, विशेषतः सणासुदीच्या काळात दिल्लीतील व्यापाराचे मोठे नुकसान झाले आहे. रामलिला मैदान हे कॅनॉट प्लेसच्या जवळ असल्यामुळे तेथील लाखो रहिवासी, दुकाने आणि व्यावसायिक आस्थापनांना त्रास होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. तसेच पुढील दोन महिने दिल्लीत सर्व प्रकारच्या आंदोलनांवर बंदी घालण्याची मागणी त्यांनी केली. उपजीविकेचा अधिकार हा केवळ नफ्यापुरता मर्यादित नसून तो छोटे व्यापारी आणि रोजंदार कामगारांशीही जोडलेला आहे.

विशेषतः कनॉट प्लेस, जंतरमंतर, रामलीला मैदान, इंडिया गेट आणि राजघाट यांसारख्या महत्त्वाच्या व गजबजलेल्या भागात निदर्शनांना बंदी घालण्याचे अनुरोध सीटीआयने पत्रात केले आहेत. सीटीआयच्या दाव्यानुसार, गेल्या १ नोव्हेंबर रोजी झालेल्या 'इंडिया' आघाडीच्या रॅलीमुळे दिल्लीतील व्यापाऱ्यांना तब्बल ११ हजार कोटी रुपयांचे मोठे नुकसान सहन करावे लागले आहे.

...तर निवडणुका घ्यायच्याच कशाला?

'गोकुळ' अध्यक्ष निवडीवरून सतेज पाटलांचा संताप

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या निवडणुकीत शेतकऱ्यांनी दिलेला कौल स्वीकारा आणि पुढील सभेला उपस्थित राहा, असे आवाहन काँग्रेसचे कोल्हापूर जिल्ह्यातील आमदार सतेज पाटील यांनी मंगळवारी विरोधकांना केले.

गोकुळमधील बहुमतासाठी कायदा बदलण्याची किंवा शासन नियुक्त संचालकांना मतदानाचा अधिकार देऊन संख्याबळ फिरवण्याची चर्चा होत असेल तर निवडणुका घ्यायचाच कशाला, असा उद्विग्न सवाल करून सत्ताधाऱ्यांच्या याखेळीलाही त्यांनी विरोध केला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील महत्वाचे सत्ताकेंद्र असलेल्या गोकुळ दूध संघाची निवडणूक गेल्या महिन्यात पार पडली. या निवडणुकीत सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील समविचारी आघाडीला २५ पैकी १३ जागा मिळाल्या. तर महायुतीला १२ जागा जिंकता आल्या. मात्र, निकाल लागूनही गोकुळला अद्याप नवा अध्यक्ष मिळालेला नाही.



